पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक – **२७/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२७/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**

२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४. मा.सुजाता सुनिल पालांडे

५. मा.गोफणे अनुराधा देविदास

६. मा.संजय मल्हारराव वाबळे

७. मा.कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शेख – उपनगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.जगताप – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३) चिंचवड येथील बळवंत चिंचवडे व्यायामशाळा संस्कृती महिला बचतगटामार्फत सेवाशुल्क तत्वावरील देखभालीसाठी मुदतवाढ देणेबाबत - मा.कुंदन गायकवाड मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर येथील अहिल्यादेवी होळकर व्यायामशाळेबाबत - मा. अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर बॅटमिंटन हॉल बाबत – मा. अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) कासारवाडी महिला जिम सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत – मा. अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल भाडेतत्वावर देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) प्रभाग क्र.१८ मधील दिनकर गजाबा भोईर व्यायाम शाळा उत्कर्ष मित्र मंडळ या सामाजिक संस्थेला चालविण्यास देणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा. अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान व मैदान परिसरातील हॉल, व्यायामशाळा शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास देणेकामी मुदतवाढ देणे – मा.संजय वाबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) किवळे येथील रामभाऊ भिमाजी तरस व्यायामशाळेस मुदतवाढ देणेबाबत – मा. अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव

----------

दिनांक १३/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०५) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २७/०७/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२५/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – कु.नुपूर लक्ष्मण मोरे, निगडी ,पुणे -४४ यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २७/०७/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२६/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – सौ.रुपाली गणेश तरवडे यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.कुंदन गायकवाड, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

संस्कृती महिला बचतगटामार्फत सन २०१६ पासून बळवंत चिंचवडे व्यायामशाळेची सेवाशुल्क तत्वावर देखभाल होत असून त्या बचतगटास ३ वर्षासाठी दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ०४
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर येथील अहिल्यादेवी होळकर उद्यानातील अहिल्यादेवी होळकर व्यायामशाळा सिध्दीविनायक मित्र मंडळ यमुनानगर या संस्थेस सेवाशुल्कावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ०५
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर बॅटमिंटन हॉल ११ वर्षाच्या कराराने प्रभागातील क्रांतिवीर मित्र मंडळ या संस्थेस मनपाचे पिंपळे गुरव,सांगवी या ठिकाणचा बॅटमिंटन हॉल कराराच्या धर्तीवर चालविण्यासाठी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – ०६
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

कासारवाडी येथील शारदा महिला व्यायामशाळा अभिनव गगन स्पोर्टस् क्लब,कासारवाडी या संस्थेला २ वर्ष कालावधीसाठी दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देऊन सेवाशुल्क् तत्वावर चालविणेस देणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – ०७
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

डॉ.हेगडेवार क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल, मासुळकर कॉलनी येथील बॅडमिंटन हॉल अभिनव गगन स्पोर्टस् क्लब,कासारवाडी या संस्थेला २ वर्ष कालावधीसाठी प्रतिमहा र.रु.१२,८५०/- आकारुन ११ महिने कालावधीसाठी भाडे कराराने भाडेतत्वावर चालविणेस मान्यता देणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०८
दिनांक – २७/०७/२०१८
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१८ मधील दिनकर गजाबा भोईर व्यायाम शाळा महापालिकेच्या वतीने उत्कर्ष मित्र मंडळ या सामाजिक संस्थेला दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २७/०७/२०१८

सुचक – मा.संजय वाबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.संजय वाबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/०६/कावि/४०४/२०१४, दिनांक ०३/११/२०१४ अन्वये पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायामशाळेसह शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी या संस्थेस दिनांक १९/१०/२०१३ ते दिनांक १८/०९/२०१४ अखेर ११ महिने कालावधीसाठी करारनामा करुन चालविण्यास देण्यात आला होता. सदर करारनाम्याची मुदत दि.१९/०९/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. मनपाकडे पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायामशाळेतील मैदान याचा ताबा घेणेकामी कर्मचारीवर्ग अपुरा असल्यामुळे तसेच सुरक्षा कर्मचारी यांची मागणी करुनही त्यांचेकडून सुरक्षा कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायामशाळेसहीत याचा ताब्याची मुदत दि.१८/०९/२०१४ रोजी संपुष्टात येऊन सदर तारखेपासून हॉल व मैदान देखभाल दुरुस्तीकामी शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी यांच्या ताब्यात आहे. तरी सबब पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायामशाळेतील मैदान हे दिनांक १९/०२/२०१४ पासून शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी या संस्थेस देखभाल दुरुस्तीसह पुर्वीचे सेवाशुल्क् रक्कमेत वाढ न करता दरमहा र.रु.२५,०००/- सेवाशुल्क देऊन दिनांक १८/०९/२०१४ पासून १० वर्षे कालावधीकरिता करारनामा करुन सेवाशुल्क् तत्वावर चालविण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक – १०

दिनांक – २७/०७/२०१८

सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

किवळे येथील रामभाऊ भिमाजी तरस ही व्यायामशाळा श्री.बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर दरमहा र.रु.२०००/-मनपाकडून घेऊन चालविणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८५/२०१८
दिनांक : ३०/०७/२०१८



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.